# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### दौंड येथील भीमा नदीवरील पूल व दौंड-पाटस येथील पथकर वसुलीस मुदतवाढ दिलेबाबत

**(१) १२८५ (२२-१२-२०१४). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) येथे राज्य महामार्ग क्र.१० वर दौंड जवळील भिमा नदीवरील पूल व दौंड-पाटस राज्य महामार्ग क्र.६७ या रस्त्यावरील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत बांधण्यात आलेल्या दौंड रेल्वे उड्डाणपूलाची पथकर वसुलीची मुदत २०११ मध्ये संपल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने शासन निर्णय क्र.खाक्षेस-२००४/प्र.क्र.३५७, रस्ते-८ दिनांक २२ सप्टेंबर, २०११ अन्वये दिनांक २३ सप्टेंबर, २०११ ते ४ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीसाठी नव्याने पथकर वसुलीचे आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २३ सप्टेंबर, २०११ ते ४ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीसाठी नव्याने पथकर वसुलीचे आदेश देण्याची कारणे काय आहेत व यापुर्वी या रेल्वे उड्डाणपूलासाठी व नदीवरील पूलासाठी असलेल्या पथकरातून किती रक्कम वसुल झालेली आहे,

(३) तसेच पथकर वसुलीची मुदत संपलेल्या कामांची पथकर वसुली बंद करणेबाबत शासनाचे धोरण असतानाही केडगांव रेल्वे स्टेशन जवळील रेल्वे उड्डाणपूलाच्या पथकर वसुलीची मुदत संपली असतानाही दुसऱ्यांदा दिनांक २२ सप्टेंबर, २०११ च्या शासननिर्णयान्वये दुसऱ्यांदा चार वर्षांची पथकर वसुली सुरु करण्याचे निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(४) पथकर वसुली मुदत संपलेल्या कामांची वसुली बंद करणेबाबत व दिलेल्या मुदतवाढही बंद करणेबाबत शासनाने घेतलेल्या धोरणात्मक भुमिकेनुसार या पथकर नाक्यास दिनांक २२ सप्टेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये दिलेली पथकर वसुलीची परवानगी रद्द करणेबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०७-२०१६) :** (१) होय.

(२) सदर प्रकल्पाचे पथकर वसुलीसाठी १५ वर्षे एवढा सवलत कालावधी प्रदान करण्यात आला होता. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सदर कामाकरीता केलेला खर्च विचारात घेऊन व या ठिकाणी अपेक्षित वाहतूक वर्दळीपेक्षा प्रत्यक्ष वाहतूक वर्दळ कमी असल्याने शासनाने दि. ०४.१०.२०१५ पर्यंत महामंडळास पथकर वसुलीस मुदत वाढ दिली आहे. सन २०११ पर्यंत या पथकर स्थानकांवर २८.९७ कोटी इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे. सदर टोलनाका दिनांक ०४.१०.२०१५ पासून बंद करण्यात आला आहे.

(३) या ठिकाणी अपेक्षित वाहतूक वर्दळपेक्षा प्रत्यक्ष वाहतूक वर्दळ कमी असल्याने शासनाने प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सुसाध्य होत नसल्याकारणाने दि.०४.१०.२०११ रोजीच्या अधिसूचनेनुसार महामंडळास दि.१६.०४.२०१८ पर्यंत वसुलीस मुदतवाढ दिली आहे.

(४) भिमा नदीवरील पूल व दौंड-पाटस रस्त्यावरील पथकराची वसूली ०४.१०.२०१५ पासून बंद करण्यात आली आहे. केडगांव रेल्वे स्टेशन जवळील रेल्वे उड्डाणपूलाच्या पथकर वसुलीची मुदत दि.१६.०४.२०१८ आहे. या ठिकाणी हलकी वाहने, एस.टी.बसेस व स्कूलबसना दि.०१.०६.२०१५ पासून पथकरातून सूट दिली आहे.

---

## राज्यातील टोकरे कोळी, महाजन कोळी, मल्हार कोळी उपजातींना आरक्षण देण्याबाबत

**(२) ६५८१ (०९-०४-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टोकरे कोळी, महाजन कोळी, मल्हार कोळी आदी उपजातींना आरक्षण देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाकडून पाठपुरावा करण्याची सद्यःस्थिती काय आहे व सदर आरक्षण मान्य करण्याकरिता किती कालावधी अपेक्षित आहे,

(३) असल्यास, आदिवासीच्या अनुसुचित जमातीमधील आरक्षणाच्या टक्केवारीबाबतचे स्वरुप काय राहणार आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१३-०७-२०१६) :** (१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे आदेश (सुधारणा) कायदा, १९७६ नुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या अनुसूचीमध्ये महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात अ.क्र. २८ वर टोकरे कोळी व अ.क्र. ३० वर कोळी मल्हार या अनुसूचित जमातीचा समावेश आहे. सदर अनुसूचतीमध्ये महाजन कोळी यांचा समावेश नाही. तसेच महाजन कोळी व इतर उपजातीना आरक्षण देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविलेला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणातील तिल्लोरी कुणबी समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याबाबत

**(३) १०३०१ (१०-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील तिल्लोरी कुणबी समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्यात यावे, यासाठी अनेक वर्षापासून लढा सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दिनांक ९ सप्टेंबर, २०१४ रोजी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार सामाजिक न्याय विभागाने राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल सत्वर मागितला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१३-०७-२०१६) :** (१) कोकणातील तिल्लोरी कुणबी समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याची मागणी आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल (जि.रायगड) येथील उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजुस वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(४) २१३४४ (११-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजुस व उड्डाणपुलावर दररोज वाहतूक कोंडीमुळे वाहनधारक व प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून लाखो लिटर इंधनही वाया जात असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएमआरडीए मार्फत तक्का कॉलनी ते पळस्पा फाटा या रस्त्याचे रुंदीकरण करण्यासंदर्भात वारंवार मागणी करुनही सदर कामास सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाहनधारक व प्रवाशांना होणारा त्रास लक्षात घेता खबरदारी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०७-२०१६) :** (१) नाही.
(२) व (३) सदर कामाचा प्रकल्प अहवाल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून तयार करण्यात येत असून प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरवात करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर शहरातील ठाकरे चौक ते डाकबंगला व सरगम चौक ते वाखरी या पालखी मार्गावर अपघात होत असल्याबाबत**

**(५) २५९५९ (१०-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर शहरातील ठाकरे चौक ते डाकबंगला व सरगम चौक ते वाखरी या पालखी मार्गावर लोकवस्ती व शाळा, महाविद्यालय असल्यामुळे मोठया प्रमाणावर वर्दळ असून येथे कोणत्याही प्रकारचे गतीरोधक, सिग्नल वा दुभाजक नसल्याने अनेक अपघात होऊन प्राण गमवावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे विशेषतः सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दुभाजक, सिग्नल व गतीरोधक बसविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ठाकरे चौक ते डाक बंगला केबीपी चौक या लिंक रस्त्यावर भरधाव येणाऱ्या वाहनांचा वेग कमी होण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक उपलब्ध करण्यात आले आहेत तसेच गरजेच्या ठिकाणी माहिती फलक बसविण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंजनगाव सुर्जी येथील एम.आय.डी.सी. मधील प्लॉट उद्योजकांनी आरक्षित केले असतानाही उद्योग न उभारल्याबाबत**

**(६) ३३७४४ (२२-१२-२०१५). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर मतदारसंघातील अंजनगाव सुर्जी येथील एम.आय.डी सी. मधील प्लॉट उद्योजकांनी आरक्षित केले असतानाही त्यावर अनेक उद्योजकांनी कुठलाच उद्योग उभारला नाही. वारंवार एक्सटेंशन घेऊन प्लॉट त्यांच्याकडेच आरक्षित आहेत, मात्र नविन उद्योजकांना अंजनगाव सुर्जी येथील एम.आय.डी.सी. मध्ये प्लॉट मिळत नाही, हे खरे आहे का,

(२) असल्यास, प्लॉट आरक्षित करुन उद्योग न उभारलेल्या उद्योजकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, मागणी करुन प्रलंबित असलेल्या उद्योजकांना अंजनगाव सुर्जी येथील एम.आय.डी.सी.मधील प्लॉट कधी मिळतील ?

**श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही. अंजनगाव सुर्जी लघु औद्योगिक क्षेत्राकरिता एकूण १०.०० हे.आर.क्षेत्र संपादित करण्यात आलेले असून सदर क्षेत्रात २७ भूखंडांचे आरेखन करुन २६ भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. त्यामधील १२ भूखंडांवर उत्पादन सुरु आहे.ज्या भूखंडांवर विकासात्मक कार्यवाही केलेली नाही अशा भूखंड धारकांवर महामंडळाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. भूखंड विकासाचा विहीत कालावधी संपुष्टात आल्यानंतर उद्योजकानी मुदतवाढीसाठी विनंती केल्यास महामंडळाच्या धोरणानुसार अटी व शर्तीची पूर्तता करीत असलेल्या उद्योजकांना भूखंड विकसित करण्यासाठी मुदतवाढ देण्यात येते.
(२) अंजनगांव लघु औद्योगिक क्षेत्रात वाटप करण्यात आलेल्या भूखंडाच्या संदर्भात महामंडळाने केलेल्या करारनाम्यात नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार भूखंड विकसित केलेला नाही अशा १० भूखंडधारकांना महामंडळाने नोटीशी दिल्या आहेत.
(३) अंजनगांव लघु औद्योगिक क्षेत्रात वाटपासाठी सध्या ०१ व्यापारी भूखंड शिल्लक आहे, ज्या भूखंड धारकांनी भूखंडावर विकासात्मक कार्यवाही केलेली नाही अशा १० भूखंड धारकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यांचे भूखंड परत घेण्याबाबतची कार्यवाही महामंडळाकडून सुरु आहे. सदर भूखंड परत महामंडळाच्या ताब्यात आल्यानंतर महामंडळाच्या धोरणानुसार भूखंड वाटपाची कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विविध सहकारी संस्थाकडे मुद्दल आणि व्याज थकीत असल्याबाबत

**(७) ३३९९७ (२२-१२-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अद्यापही ५५ सहकारी संस्थाकडे मुद्दल आणि व्याजाचे एकूण २९३ कोटी ११ लाख ५० हजार रुपये थकीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर थकीत रक्कम संबधिताकडून वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

त्या ५५ संस्थाकडे दिनांक ३१/०३/२०१५ अखेर मुद्दल व व्याज मिळून एकूण रुपये २९३ कोटी ११ लाख ५० हजार एवढी रक्कम थकीत येणे आहे.

(२) बँकेच्या वसुली अधिकाऱ्यामार्फत वसुलीची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्वारगेट-पुणे येथील जे. धे. चौकामध्ये बांधण्यात येत असलेल्या उड्डाणपुलाच्या बांधकामाबाबत**

**(८) ३४४०५ (२१-०१-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वारगेट-पुणे येथील जे. धे. चौकामध्ये बांधण्यात येत असलेल्या उड्डाणपुलाच्या एका खांबाचे बांधकाम चुकीच्या पद्धतीने झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत काही नागरिकांनी महानगरपालिकेकडे खुलासा करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०७-२०१६) :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास पुणे महानगरपालिकेच्या सर्व पदाधिकारी, पक्ष नेते, विरोधी पक्ष नेते व संबंधीत प्रभागाचे सभासद यांच्या समोर सादरीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार महामंडळाने याबाबतची सविस्तर माहिती सर्व संबंधीत पदाधिकाऱ्यांना दिली असून सदरहू काम आयआयटी पवई या मान्यता प्राप्त संस्थेने मंजूर केलेल्या संकल्पचित्रानुसार करण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले सदरहू उड्डाणपूल वाहतूकीस खुला करण्यापूर्वी आवश्यक त्या सर्व तांत्रिक चाचण्या करुन घेऊन त्याबाबतचे तंज्ञ सल्लागाराचे प्रमाणपत्र घेऊन उड्डाणपूलाच्या सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना केल्यानंतरच उड्डाणपूल वाहतूकीस खुला करण्याच्या सूचना पुणे महानगरपालिकेने दिल्या होत्या. त्यानुसार महामंडळाने स्वारगेट एसटी स्थानक ते साई मंदिरापर्यत उड्डाणपूलाचे काम पूर्ण झाल्याने हा उड्डाणपूल वाहतूकीस खुला केला आहे. एकंदर प्रकल्पातील उड्डाणपूलाचे काम पूर्ण करुन सर्व चाचण्या घेतल्यानंतर उड्डाणपूल दिनांक २७.०५.२०१६ रोजी वाहतूकीस खुला करण्यात आला आहे.

---

**कोकणातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या**
**एमआयडीसीमध्ये भूखंड वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(९) ३४६५० (२२-१२-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) कोकणातील एमआयडीसीत भूखंड वाटपात गैरव्यवहार झाला असून गरजूंना वंचित ठेवून आधीच भूखंड घेतलेल्यांना केवळ दलालांच्या इशाऱ्यांवर पुन्हा भूखंड दिले गेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतापर्यंत कोकणतील एमआयडीसीतील भूखंड पडून असून नियमानुसार उद्योग सुरु न केल्यास ५ वर्षात ते भूखंड एमआयडीसीने परत घेणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील १०-१५ वर्षापासून ज्यांनी भूखंड आपल्या ताब्यात ठेवले आहेत व मागील १५ वर्षाच्या कालावधीत त्यावर एकही उद्योग उभारलेला नाही, असे भूखंड एमआयडीसीने अतापर्यंत ताब्यात न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) महामंडळाकडून औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना भूखंड वाटप केल्यानंतर भूखंड विकासाकरिता प्राथमिक करारनाम्यानुसार प्रभाग निहाय अ व ब विभागाकरिता ३ वर्षे, क विभागाकरिता ४ वर्षे, व ड व ड+ विभागाकरिता ५ वर्षे कालावधी देण्यात येतो. या कालावधीत भूखंडाचा विकास न केल्यास भूखंडधारकास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येते. भूखंड धारकाने मुदतवाढीची मागणी केल्यास शुल्क आकारुन मुदतवाढ देण्यात येते. तरीही भूखंड धारकाने वाढीव कालावधीत इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन उद्योग सुरु न केल्यास करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यवाही करुन भूखंड परत महामंडळाच्या ताब्यात घेतले जातात.

(३) व (४) सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयामधील ५१ भूखंड आत्तापर्यंत महामंडळाच्या ताब्यात घेण्यात आलेले आहेत.रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयासाठी केंद्र सरकारच्या पर्यावरण व वन विभागाकडून नवीन प्रकल्पांसाठी ऑगस्ट २०१० मध्ये स्थगिती देण्यात आल्याने उद्योजकांना भूखंडांचा विकास करता आला नाही.केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाने सदर स्थगिती दिनांक १७/१०/१३ व दिनांक २५/७/२०१५ च्य आदेशान्वये उठविण्यात आल्यामुळे महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये ठराव पारीत करुन जेवढया कालावधीसाठी स्थगिती देण्यात आली होती तेव्हढाच सुधारित कालावधी वाढवून देण्यात आलेला आहे. याशिवाय महामंडळाने भूखंडाचा विकास करण्याकरिता मुदतवाढ/ विशेष मुदतवाढ देऊनही ज्या भूखंड धारकानी मुदतवाढीकरिता महामंडळाकडे संपर्क केलेला नाही अशा सर्व भूखंड धारकांना शेवटची संधी म्हणून उद्योग संजीवनी योजना लागू करण्यात आली असून तीचा

कालावधी ३१/१/२०१७ पर्यंत देण्यात आला आहे.तथापि सदर कालावधीनंतर भूखंडाचा विकास केला नाही तर भूखंड ज्या स्थितीत आहेत त्या स्थितीत महामंडळाकडे वर्ग होणार आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील कारखाने उभारणीसाठी दिलेले भूखंड परत घेण्याबाबत**

**(१०) ३४७०२ (२२-१२-२०१५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील कारखाने उभारणीसाठी दिलेले एकूण ७२ भूखंड महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने परत घेतले असून ९६ भूखंड परत घेण्याची कारवाई करण्यात येत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यस, वरील भूखंड परत घेण्याची कारणे काय आहेत, परत घेतलेला भूखंड नविन कारखानदारांना देण्यात येणार आहेत काय, असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचे वाटप झाल्यानंतर महामंडळाकडून करारनामा करण्यात येतो. त्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार भूखंडधारकाने विहीत कालावधीत भूखंड विकसित केला नाही तर तो परत घेण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार नांदेड औद्योगिक क्षेत्रामधील ज्या भूखंडधारकांनी भूखंड विहीत कालावधीत विकसित केला नाही असे ७२ भूखंड परत घेण्यात आले असून ९६ भूखंड परत घेण्याची कार्यवाही महामंडळाकडून सुरु आहे. तसेच परत घेतलेल्या भूखंडांचे वाटप महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार व संबंधित औद्योगिक क्षेत्रामध्ये असलेल्या कार्यपध्दतीनुसार सरळ / उद्योग विस्तार/ किंवा निविदा प्राप्त करुन भूखंडाचे वाटप करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे शिंदे गावास गावठाण वाढविस्तारासाठी संपादित क्षेत्रातून १३.४८ हे.आर क्षेत्र मिळणेबाबत**

**(११) ३४८४२ (२२-१२-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ साठी मौजे शिंदे गावातील गट क्र. २५० एकूण क्षेत्र ६२.७४ हे.आर एमआयडीसीने संपादित केले असल्याचे माहे ऑक्टोबर २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावठाण वाढ विस्तारासाठी संपादित क्षेत्रातून १३.४८ हे.आर क्षेत्र उद्योग मंत्र्यांस स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे. चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.२ साठी मौजे शिंदे, ता.खेड, जि.पुणे येथील गायरान गट नंबर २५० क्षेत्र ६२.७४ हे.आर ही शासकीय जमिन जिल्हाधिकारी, पुणे यांच्यामार्फत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला हस्तांतरीत करण्यात आली आहे. ग्रामपंचायत शिंदे यांनी सदर क्षेत्रापैकी, गावठाण वाढीसाठी १० हेक्टर क्षेत्र व ठाकर वस्तीसाठी ३.४८ हे.आर क्षेत्र असे एकूण १३.४८हे.आर क्षेत्र परत मिळण्यासाठी निवेदन सादर केले आहे. त्या अनुषंगाने सदर क्षेत्र सोडून उर्वरित ४९.२६ हे.आर क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील कलम २ खंड (ग) अन्वये औद्योगिक क्षेत्र घोषित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुष्णूर (जि.नांदेड) पंचतारांकित औद्योगिक वसाहत रस्त्याची कामे निकृष्ट झाल्याबाबत

**(१२) ३५४२७ (२२-१२-२०१५). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुष्णूर (जि.नांदेड) पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत कोट्यावधी रुपये खर्चून केलेली रस्त्याची कामे निकृष्ट झाल्यामुळे सदर रस्ते एका वर्षातच उखडून गेले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसाहत रस्त्यांची निकृष्ट कामे केल्याबद्दल शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

कुष्णूर ( जि.नांदेड ) पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील रस्त्याची कामे निविदा मागवून त्यामधील अटी व शर्तीनुसार करण्यात आलेली आहेत. तसेच सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या बांधकाम साहित्याचा दर्जा तपासण्यात आला असून प्रत्येक कामाची गुणवत्ता तपासण्यात आली आहे.

कुष्णूर औद्योगिक क्षेत्रातील मागील वर्षात करण्यात आलेली सर्व रस्त्यांची कामे सुस्थितीत असून त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.त्याबाबत कोणतीही तक्रार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक (पूर्व) या विभागाअंतर्गत असलेल्या चांदवड-मनमाड-नांदगांव या राज्यमार्गाचे कामास सुरुवात करण्याबाबत**

**(१३) ३५७२५ (२२-१२-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक पूर्व या विभागांतर्गत असलेल्या चांदवड, मनमाड, नांदगाव राज्य मार्ग क्र.२४ या रस्त्याचे बी.ओ.टी. तत्वावर मंजूर असलेले व कामाची न्यूनतम देकार निश्चिती (निविदा निश्चिती) झालेले असतांना देखील आजतागायत सदर कामास संबंधित विभागाकडून सुरवात करण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास उपरोक्त रस्त्याचे काम कोणत्या कारणामुळे प्रलंबित राहिलेले आहे त्या बाबतची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, चांदवड, मनमाड, नांदगाव या राज्यमार्गाचे काम सुरु करण्याच्या दृष्टीकोनातून शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०६-२०१६) :** (१) होय.

(२) भूसंपादनमुळे काम प्रलंबित आहे.

(३) प्रकल्पासाठी ८२.१३ हे जमीनीचे भुसंपादन करण्याची प्रक्रिया प्रगतीत असून जमीन ताब्यात आल्यावर उदयोजकास कार्यारंभ आदेश देण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मनमाड (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथे शासकीय औद्योगिक वसाहतीस मंजुरीबाबत**

**(१४) ३५८५९ (२२-१२-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड (ता.नांदगाव, जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीसाठी मनमाड शहरालागत शिंगवे (ता.चांदवड) येथील शेत जमिनींचे महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत मनमाड औद्योगिक वसाहतीसाठी सर्वेक्षण व जमिनींचे आरक्षण सन १९९४-९५ या वर्षात व त्या सुमाराच्या कालावधीस केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनमाड औद्योगिक वसाहत होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे शिंगवे, ता.चांदवड, जि.नाशिक येथील १२.०६ हे.आर. खाजगी क्षेत्रास प्रकरण ६ च्या तरतुदी लागू करण्यासंबंधीची अधिसूचना दिनांक ५/२/२००४ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) नियोजित मनमाड औद्योगिक क्षेत्राकरिता कायम स्वरुपी पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नसल्याने अधिसूचित करण्यात आलेले क्षेत्र दिनांक २९/१०/२००९ च्या अधिसूचनेद्वारे विनाअधिसूचित करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर तालुक्यात एम.आय.डी.सी.ची घोषणा होवून**
**देखील एम.आय.डी.सी.होवू शकली नसल्याबाबत**

**(१५) ३६१८९ (२२-१२-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर तालुका हा सोलापूर जिल्हयातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील एक विकसनशील तालुका असून दक्षिण भारतीतील प्रमुख तिर्थक्षेत्र आहे. परंतु या तालुक्यात एम.आय.डी.सी.ची घोषणा करणे, जागेचा सर्व्हे करणे, जागा निश्चिती करणे इत्यादी सर्व सोयस्कर होवून देखील एम.आय.डी.सी.होवू शकली नाही, हे खेर आहे काय,
(२) असल्यास, शासन यावरती कोणता ठोस निर्णय घेणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०८-०६-२०१६) :** (१) व (२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पंढरपूर तालुक्यातील पंढरपूर - सातारा मार्गावरील मौजे भाळवणी येथील ५५९.०४ हेक्टर आर खाजगी व १.३८ हेक्टर सरकारी अशा एकूण ५६०.४२ हेक्टर आर क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ नुसार प्रकरण ६ च्या तरतूदी लागू करण्यासंबंधीच्या प्रस्तावास उच्चाधिकार समितीच्या दिनांक ५/१२/२०१३ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. तसेच पाण्याचे आरक्षण प्राप्त झाल्यानंतर पांच वर्षात भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करावी असे निर्देश समितीने दिल्यानुसार उप अभियंता, मऔविम यानीं पाण्याच्या आरक्षणासाठी कार्यकारी अभियंता, भीमा पाटबंधारे विभाग (पंढरपूर) यांना प्रस्ताव सादर केला होता. तथापि अद्यापपर्यंत पाण्याचे आरक्षण प्राप्त न झाल्याने सदर क्षेत्रासाठी प्रकरण ६ च्या तरतुदी लागू न करता सदर क्षेत्र वगळण्यासंबंधीचा प्रस्ताव महामंडळाने शासनास सादर केला आहे.त्यावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरपना तालुक्यातील पारडी आदिवासी सेवा सहकरी सोसायटी**
**मध्ये पीककर्ज पुनर्गठन नावावर गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१६) ३६६५२ (२१-१२-२०१५). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरपना तालुक्यातील (जि.चंद्रपुर) पारडी आदिवासी सेवा सहकारी सोसायटी मध्ये बोगस ७/१२ च्या आधारे शेती कर्जाचे वाटप केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ व त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३१ मार्च पर्यंत ज्या कर्जदारांनी कर्ज भरले नाही अशा कर्जदारांना पीककर्ज पुनर्गठन नावावर दलांलाच्या मार्फत कर्जाचे वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने या प्रकरणाची चौकशी केली वा करण्यात येत आहे, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच दोषींवर काय कारवाई करण्यात आली आहे वा येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

नागपूर विभागातील चंद्रपूर जिल्ह्यातील तालुका कोरपना येथील पारडी आदिवासी सेवा सहकारी संस्थेचे कर्जमागणी अर्ज हे गटसचिवांमार्फत अर्ज तपासणी करताना संस्थेचा रेकॉर्ड, ७/१२ इत्यांदीची तपासणी करुनच संस्थेला कर्जवाटप करण्यात येते.
(२) हे खरे नाही.

सभासदांना कर्जवाटप संस्थेमार्फत होतो दलालांमार्फत होत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी-वसई मार्गावर खारबांव खाडीवरील पुलाखालील गाळ काढण्याबाबत**

**(१७) ३७०२७ (२२-१२-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी-वसई मार्गावर खारबांव खाडीवर सन २०११ पासून पुलाचे बांधकाम कंत्राटदाराकडून सुरु असून ते करतांना खाडी पात्रात भराव करण्यात आल्यामुळे तसेच २६ वर्षापूर्वी खारबांव खाडीतील पुलाचे बांधकाम सुरु असताना निकृष्ट बांधकामामुळे अर्धवट पुलाचा भाग खाडीपात्रात कोसळल्याने नदीपात्रात गाळ साचला असून सदर परिसरात पूरपरिस्थती निर्माण होऊन तेथील संरक्षक बांध तूटून मोठ्या प्रमाणात खाडीचे दुषित पाणी भातशेतीत गेल्याने तेथी शेतक-यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून त्यामुळे पुलाखाली गाळ काढण्याची मागणी तेथील प्रदूषण निर्मुलन शेतकरी समितीचे अध्यक्ष व सरचिटणीस यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार खाडीचे दुषित पाणी शेतक-यांच्या भातशेतीत घुसल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून नुकसान भरपाई देण्याबाबत व सदरहू पुलाखाली गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०७-२०१६) :** (१) भिवंडी वसई मार्गावरील खारबांव खाडीवर जुन्या पुलालगत सन २०११ पासून नवीन पुलाचे बांधकाम चालु असून तेथे मातीभराव टाकण्यात आला होता. सदरचे काम पूर्ण झाल्यावर मातीभराव काढण्यात आलेला आहे. खाडीचे पाणी पूलाच्या दोन्ही गाळयांमधून नैसर्गिकरीत्या वेगाने सुरळीत वाहत असुन पूरपरिस्थिती अथवा शेतीचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

२६ वर्षापूर्वी जुन्या खारबांव खाडीपुलाचे बांधकाम सुरु असतांना पुलाचा भाग खाडीपात्रात कोसळल्याबाबत अभिलेखामध्ये नोंद नाही.

प्रदुषण निर्मुलन शेतकरी समितीचे अध्यक्ष व सरचिटणीस यांचे पुलाखाली गाळ काढण्याची मागणी बाबतचे निवेदन आढळून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती व अकोला मध्यवर्ती सहकारी बॅंकेने शेतकऱ्यांचे पीक कर्जाचे पुनर्गठन करुन शेतकरी पीक कर्ज उपलब्ध करुन न दिल्याबाबत

**(१८) ३७२०३ (२२-१२-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दुष्काळ जाहीर केल्यानंतरही अमरावती व अकोला मध्यवर्ती सहकारी बॅंकेने शेतकऱ्यांचे पीक कर्जाचे पुनर्गठन करुन शेतकरी पीक कर्ज उपलब्ध करुन न दिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करण्याबाबत समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरेआहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने चौकशी करुन अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) सदर अहवालानुसार काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

बॅंकेने मागील वर्षी सन २०१४-१५ मध्ये ५८४८५ शेतकऱ्यांना रक्कम रु. ४३४.९४ कोटीचे पीक कर्ज वाटप करण्यात आलेले होते. दिनांक ३०.०६.२०१५ अखरे पर्यत वसुली न भरणाऱ्या १९४२२ शेतकऱ्यांच्या कर्जाचे बॅंकेने रुपांतर करुन १२३७५ शेतकऱ्यांना रु. ३४.१४ कोटीचे रुपांतरीत कर्ज वाटप केलेले आहे.

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती या कार्यालयाने रुतांतरीत १०० टक्के सभासदांना कर्ज वाटप करणेबाबत बॅंकेला पत्र व्यवहार केलेला आहे. बॅंकेने दिनांक २३.१०.२०१५ अन्वये सादर केलेल्या खुलाशा नुसार उर्वरीत ७०४७ रुपांतरीत पात्र शेतकऱ्यांनी बॅंकेकडे आवश्यक ती कर्ज वाटपाची कागदपत्रे सादर न केल्यामुळे किंवा कर्जाची मागणी न केल्यामुळे कर्ज वाटप करण्यात आलेले नाही.

अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने (अकोला + वाशिम या जिल्ह्यांनी) सन २०१५-१६ या खरीप हंगामात अल्प मुदत कर्जाचे ४६३९२ सभासद रक्कम रु. २४५०५.३४ लाख रुपांतर तसेच २५८८४ सभासद रक्कम रु ११८६८.७२ लाख फेर रुपांतर असे एकूण ७२२७६ सभासद रक्कम रु. ३६३७४ लाख रुपांतर केले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुलूंड पश्चिम (मुंबई पूर्व) येथील श्री.दिवाकर कोयंडे व त्यांच्या पत्नी यांनी जागेचे खोटे कागदपत्र तयार करुन कित्येक रहिवाशांना फसविल्याबाबत**

**(१९) ३७८३५ (२२-१२-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या पूर्व उपनगरातील मुलूंड पश्चिम येथे राहणा-या श्री.दिवाकर कोयंडे व त्यांच्या पत्नीने त्यांच्याकडे असलेल्या शासकीय परवाना तपासणीस पॅनल नं.अेजीडी-३०२ (Government Certified Auditor Panal No.AGD - ३०२) नुसार सहकारी सोसायटीच्या तपासणीचे काम करत असताना त्यांनी जागेचे खोटे कागदपत्र तयार करुन कित्येक रहिवाशांना फसविले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तेथील रहिवाशी श्री. रविंद्र सखाराम हरळकर यांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २००९ व दिनांक १० जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास फसवणूक केल्याबाबतची तक्रार मुलूंड पश्चिम पोलिस ठाणे येथे दाखल केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित पती पत्नींचा शासकीय परवाना रद्द करुन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) श्री. रविंद्र सखाराम हरळकर, यांनी दिनांक १०.०७.२०१५ रोजी श्री. दिवाकर कोयंडे यांच्या विरुध्द निवासस्थानाचे खरेदी खत फसवणूकीबाबत तक्रार अर्ज केला आहे. तथापि जागे संबंधी सिटी सिव्हील कोर्ट मुंबई येथे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदर प्रकरणी सिटी सिव्हील कोर्ट मुंबई येथे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

**बारामती (जि.पुणे) एमआयडीसीत उद्योगांसाठी भूखंड मिळण्यासाठी जवळपास ८०० उद्योजक प्रतिक्षेत असतांना त्यांना प्राधान्य देण्याऐवजी लिलाव पध्दतीने भूखंड देण्याबाबत**

**(२०) ३८०१४ (२२-१२-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील बारामती एमआयडीसीत उद्योगांसाठी भूखंड मिळण्यासाठी जवळपास ८०० उद्योजक प्रतिक्षेत असतांना त्यांना प्राधान्य देण्याऐवजी लिलाव पध्दतीने भूखंड देण्याचा घाट घातल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) तसेच ११० भूखंडाचे एकत्रीकरण करुन कोकाकोला कंपनीला भूखंड दिले. परंतु हा भूखंड सध्या रिकामा आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ८० टक्के भूखंड पडून असून २५ वर्षे ताबा घेऊनही फक्त शेड उभारण्यात आल्या आहेत हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) :** (१) पुणे जिल्हयातील बारामती औद्योगिक क्षेत्रातील पंचनाम्याने ताब्यात घेतलेले व भूखंडधारकाने परत केलेल्या भूखंडांच्या संदर्भात महामंडळाच्या दिनांक १०/१२/१९९८ च्या परिपत्रकानुसार लिलाव पध्दतीने विक्री करण्याचे धोरण असल्याने दिनांक २/९/२०१५ रोजी दैनिक पुढारी, पुणे, दैनिक नवशक्ती, मुंबई व फ्रि प्रेस जर्नल या वृत्तपत्रांमध्ये निविदा प्रसिध्द करण्यात येऊन ती महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आली होती. तथापि सदर लिलाव प्रक्रियेस तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती देण्यात आली आहे.

(२) बारामती औद्योगिक क्षेत्रातील विहीत कालावधीत भूखंडाचा विकास न केल्यामुळे पंचनाम्याद्वारे / करारनामा रद्द केलेले / उद्योजकानी स्वत: परत केलेले असे एकूण ३४५ भूखंड महामंडळाने ताब्यात घेतले असून त्यातील ११० भूखंडांचे वाटप मे.कोका-कोला बेव्हरेज प्रा.लि.या बहुराष्ट्रीय कंपनीस करण्याचे प्रस्तावित होते. परंतु जून, २०१५ मध्ये सदर कंपनीने तांत्रिक अडचणीमुळे प्रकल्प कार्यान्वित करण्यास असमर्थतता दर्शविल्याने सदरचे क्षेत्र M/s.Bauli India Bakes & sweets Pvt.Ltd व M/s.Dorsogna Sweet Ingredients Pvt.Ltd या परदेशी गुंतवणूकधारकांना व इतर कंपन्याना वाटप करण्यात आले आहे.

(३) व (४) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार ज्या भूखंडधारकांनी विहीत कालावधीत भूखंडाचा विकास केला नाही असे एकूण ३४५ अविकसित भूखंड महामंडळाने पंचनामा करुन ताब्यात घेतलेले आहेत.

---

**जव्हार-सिल्व्हासा या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(२१) ३८०२६ (२२-१२-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील जव्हार-सिल्व्हासा रस्त्याची दुरुस्ती व डांबरीकरण न झाल्यामुळे

तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग दुर्लक्ष करीत असल्याने रस्त्याची दुर्दशा झाली असून अपघातांत वाढ होत असल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ रोजी शासनास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने या रस्त्याची पाहणी व चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्ता किती कालावधीत दुरुस्त करण्यात येणार आहे तसेच याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०७-२०१६) :** (१) प्रश्नांकित रस्त्यावर काही प्रमाणात खड्डे होत हे अंशतः खरे आहे. तथापि रस्त्याच्या नादुरुस्त स्थितीमुळे कोणत्याही प्रकारचा अपघात झालेल्या दिसून येत नाही.

सद्य:स्थितीत खड्डे भरले असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींतील समस्या सोडविणेबाबत**

**(२२) ३८१४७ (२२-१२-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींना जागा, पाणी, फायरस्टेशन, पोलीस स्टेशन तसेच इतर अन्य समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत असल्याबाबतचे निवेदन मा.मुख्यकार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, मुंबई यांना मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ सातारा यांनी दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार सातारा येथील औद्योगिक वसाहतींना भेडसावणाऱ्या समस्या सोडविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सातारा औद्योगिक क्षेत्राजवळील प्रस्तावित देगाव, निगडी, वर्णे क्षेत्रास स्थानिक शेतकऱ्यांचा भूसंपादनास विरोध असल्यामुळे सदर क्षेत्र विनाअधिसूचित करण्याची कार्यवाही सुरु आहे तथापि उद्योजक संघटना व स्थानिक प्रतिनिधी यांनी नवीन जागा प्रस्तावित केल्यास भूसंपादनाबाबत महामंडळातर्फे कार्यवाही करण्यात येईल.

पुसेगाव, निढळ औद्योगिक वसाहतीकडे जाणारा सातारा - सोलापूर राज्यमार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असल्यामुळे त्या विभागाने रस्ता रुंदीकरण/चौपदरीकरण करणे योग्य होईल. कृष्णा नदीच्या भूस्तराचा विचार करता बंधारा बांधणे ही खर्चिक बाब असल्याने पाणी वापराच्या सम प्रमाणात आर्थिक खर्च उचलण्याचे

महामंडळाने प्रस्तावित केले असून उन्हाळयामध्ये नदीवर गरजेप्रमाणे मातीचा बंधारा बांधून औद्योगिक क्षेत्रास पाणी कमी पडणार नाही याची काळजी घेतली जाते.

सातारा जिल्हयातील औद्योगिक क्षेत्राचा विचार करता सातारा येथे महामंडळाचे प्रादेशिक कार्यालय व कार्यकारी अभियंता कार्यालयाची आवश्यकता नाही तथापि भविष्यात तत्कालिन परिस्थिती पाहून निर्णय घेण्यात येणार आहे.

सातारा नगरपालिकेकडे फायर स्टेशनची सोय असून ते औद्योगिक क्षेत्राच्या नजीक आहे तथापि फायर स्टेशन बांधण्याकरिता अतिरिक्त सातारा औद्योगिक क्षेत्रात महामंडळाने भूखंड आरक्षित केला आहे.

कारखाना खूप वर्षे बंद असल्यास भूखंड हस्तांतर करताना कामगारांच्या देण्यांबाबत कामगार आयुक्तांच्या ना हरकत दाखल्याची मागणी करण्यात येते. अन्यथा कारखाना तात्पुरता बंद असेल तर भूखंडधारकाकडून कामगारांच्या देण्यांबाबतचे संयुक्त हमीपत्र घेऊन भूखंड हस्तांतरीत केला जातो.

जुन्या सातारा औद्योगिक क्षेत्राच्या हद्दीत पोलीस चौकी कार्यरत असून नविन औद्योगिक क्षेत्राकरिता पोलीस चौकीसाठी सामाईक सुविधा केंद्राच्या इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गंगाखेड (जि.परभणी) येथील गोदावरी नदीवरील पुलाच्या बांधकामाबाबत**

**(२३) ३९५७६ (१३-०१-२०१६). श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड (जि.परभणी) येथील गोदावरी नदीवर गंगाखेड ते धारखेड जोडला जाणारा पुल बांधकामाची मागणी स्थानिक लोकप्रतीनिधींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मंत्री महोदयांनी मागणीच्या अनुषंगाने सचिव (रस्ते) यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास बांधकामाबाबत सुचना केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन त्या पुलाच्या बांधकामाबाबत व गंगाखेड शहराच्या उत्तरे कडील सोळा गावांच्या नागरीकांचा व स्थानीक लोकप्रतीनीधींच्या मागणीस मंजुरी केव्हापर्यंत देणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०७-२०१६) :** (१) होय.

(२), (३) व (४) प्रश्नाधीन पूल हा जिल्हास्तरीय रस्त्यावरील असून सदर पूलाचे काम मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**मौजे घाटघर, पो.आंजनावळे (ता.जुन्नर, जि.पुणे)**
**येथील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(२४) ४०३८१ (०४-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घाटघर, पो.आंजनावळे (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील गावापासून पोस्ट बेसिक आश्रम शाळेपर्यंत जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावरून कोणतेही वाहन धावू शकत नसल्याने रस्त्या अभावी विद्यार्थ्यांना शाळेत जाण्या-येण्याचे प्रवास पायीच करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०७-२०१६) :** (१) नाही, हे खरे नाही.

मौजे घाटवर पो. अंजनावळे (ता. जुन्नर, जि. पुणे) या रस्त्यांची एकुण लांबी ४.०० किमी आहे. सदर रस्त्यापैकी १.०० कि.मी. रस्ता ग्रामीण मार्ग १ असून सदर लांबी जिल्हा परिषद यांचे अखत्यारित असून, सुस्थितीत आहे. उर्वरित ३.०० कि.मी. लांबी प्रजिमा - १ चा भाग असून सदर लांबी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देखभाल व दुरुस्तीसाठी आहे, वा लांबीतील आवश्यक दुरुस्तीची कामे मंजूरी, निधि निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात किरकोळ व्यापारी धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(२५) ४०५५७ (२८-०४-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील छोट्या आणि किरकोळ व्यापाऱ्यांना कायद्याच्या विविध जाचक अटीतून शासनाकडून दिलासा देण्यासाठी रात्री उशिरा पर्यंत दुकान सुरु ठेवण्यापासून ते दुकानांना अतिरिक्त एफ एस आय देणे तसेच थेट शेतकऱ्यांकडून शेतमाल घेऊन तो विकता येणे अशा किरकोळ व्यापार धोरणाला मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किरकोळ व्यापार धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्य पातळीवर उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शासनाच्या सदर प्रस्तावामुळे यापुढे कृषी उत्पन्न बाजार समित्या बंद पडण्याची स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर धोरणाची सद्यस्थिती काय आहे व धोरणाला तत्वता मान्यता देण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१३-०७-२०१६) :** (१) व (२) शासन निर्णय क्र. किविधी-२०१५/प्र.क्र११३/उद्योग-२,दिनांक१०/०२/२०१६ न्वये राज्याचे किरकोळ व्यापार धोरण-२०१६ जाहीर करण्यात आले आहे हे धोरण -२०१६ जाहीर करण्यात आले आहे. हे धोरण आखताना विविध विभागाशी विचारविनिमय करण्यात आला असून धोरणात प्रामुख्याने आर्थिकेतर सवलती जाहीर केल्या आहेत.

राज्य स्तरावर या धोरणाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शक्तीप्रदान समितीचे गठन दिनांक १०/०२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आले आहे.

(३) नाही.

(४) सदर धोरण शासनाने दिनांक १०/०२/२०१६ रोजी जाहीर केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली (जि. हिंगोली) तालुक्यातील खेर्डा येथील माळहिवरा ते सिरसम रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२६) ४१३३४ (०४-०५-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली (जि. हिंगोली) तालुक्यातील खेर्डा येथून जवळच असलेल्या माळहिवरा ते सिरसम बु. या दोन कि.मी. रस्त्याची दुरवस्था झाली असून या रस्त्यात गिट्टी, दगड उघडे पडले असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याचे काम पुर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१६) :** (१) होय, अंशतः खरे आहे.
(२) व (३) प्रश्नांकित रस्त्याची लांबी ही प्रजिमा २९ ते नांदुरा - बोरावा - पांगरी - कसगाव - प्रजिमा ७ माळहिवरा - सिरसम - दिग्रसवाणी - गाडीबोरी या प्रजिमा - २ चा भाग आहे. माळिहवरा ते सिरसम या दोन गांवामधील रस्त्याची लांबी ७.९० किमी आहे. यापैकी ५.८०० लांबीमधील डांबरी पृष्ठभाग सुस्थितीत आहे. उर्वरीत २.१०० किमी लांबीमध्ये खडी व मुरुमाचा वापर करुन खड्डे भरण्याचे काम पूर्ण करण्यात आले.

रस्त्यावरील बेलगाडी व ट्रक्टरच्या वाहतुकीमुळे रस्त्याच्या पृष्ठभागावरील खडी किरकोळ प्रमाणात उखडली होती. कामाचा दोष दायित्व कालावधी संपुष्टात आलेला नसल्याने संबंधित कंत्राटदाराकडून त्याच्या खर्चाने रस्त्याच्या पृष्ठभागाची दुरुस्ती केली असून सद्यःस्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

---

**सहकार विभागाच्या आदेशानुसार झालेल्या सर्वेक्षणात सांगली जिल्हयातील अनेक सहकारी संस्था अवसायनात निघणार असल्याबाबत**

**(२७) ४१५८१ (२७-०४-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकार विभागाच्या आदेशानुसार झालेल्या सर्वेक्षणामध्ये सांगली जिल्हयातील संस्थांचे सर्वेक्षण करण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेमक्या किती संस्थांचे सर्वेक्षण करण्यात आले,

(३) असल्यास, यामध्ये कृषी व दुग्धविकास संस्था तसेच इतर कोणकोणत्या प्रकारच्या संस्थांचा समावेश आहे,

(४) असल्यास, यातील किती संस्था अवसायनात निघणार आहेत,

(५) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०७-२०१६) :** (१) होय.

(२) एकूण ५०६४ इतक्या संस्थाचे सर्वेक्षण करण्यात आले.

(३) यामध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, प्राथ.शेती पतपुरवठा व इतर शेती पतपुरवठा, नागरी बँका, नागरी/ग्रामीण पतपुरवठा नोकरदार पतपुरवठा, गृहनिर्माण संस्था व प्रिमायसेस संस्था, मजूर संस्था,बलुतेदार संस्था, पाणी पुरवठा व पाणी वाटप संस्था, सर्व प्रकारच्या संघीय संस्था, खरेदी विक्री संस्था, कृषि प्रक्रिया सहकारी संस्था, जिनिंग प्रेसिप सहकारी संस्था, ग्राहक सहकारी संस्था, इतर सर्व प्रकारच्या सहकारी संस्था, साखर कारखाने, सुत गिरण्या मध्यवर्ती दुग्ध पुरवठा संस्था, प्राथमिक दुग्ध पुरवठा संस्था, प्राथमिक कुक्कट पालन संस्था, प्राथमिक पशुसंवर्धन संस्था, प्राथमिक मच्छिमार संस्था, या प्रकारच्या संस्थांचा समावेश आहे.

(४) सांगली जिल्हयातील एकूण १३५४ संस्था अवसायनात निघणार आहेत.

(५) बंद आढळून येणे, नोंदणीकृत पत्तावर आढळून न येणे, ठावठिकाणा आढळून न येणे तसेच उद्देशाप्रमाणे कामाकाज सुरु नसणे या कारणामुळे या संस्था अवसायनात निघणार आहेत.

---

**राज्यातील चर्मकार समाजाच्या विविध मागण्यांबाबत**

**(२८) ४१८०७ (२८-०४-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद**

**जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चर्मकार समाजाच्या आर्थिक, सामाजिक मागण्यांवर निर्णय घेण्यासाठी मा.सामाजिक न्यायमंत्री यांचेसमवेत दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी चर्मकार संघटनांची बैठक घेतलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न (१) मधील प्रकरणी बैठकीत केलेल्या चर्मकार समाजाच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व आतापर्यंत कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१६) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर-महाड प्र.रा.मा. १५ या भोर हद्दीतील रस्त्याचे रूंदीकरण करून पृष्ठभागाचे नूतनीकरण करणेबाबत**

**(२९) ४२३५७ (२९-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व रायगड या जिल्ह्याला मुख्यालयापासून कमी अंतराने जोडणारा पंढरपूर-महाड प्र.रा.मा. १५ हा भोर हद्दीतील सुमारे ३५ कि.मी. लांबीचा रस्ता केवळ ३.७५ मीटर रुंदीचा असल्याने तो ५.५० मीटर रुंदीचा करुन पृष्ठभागाचे नूतनीकरण करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांना व दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०७-२०१६) :** (१) होय,

मा. श्री. संग्रामदादा थोपटे वि.स.स. भोर - वेल्हा - मुळशी यांनी दिनांक ३०/११/२०१५ रोजी निवेदन दिले आहे .

(२) व (३) प्रश्नांकित रस्ता हा प्र.रा.मा.क्र्र. १५ महाड - भोर - पंढरपूर या रस्त्याच्या एक भाग आहे. भोर तालुक्यातील या रस्त्याची लांबी ५१ कि.मी आहे. या लांबीपैकी २६.५० कि.मी. लांबीमध्ये रस्त्याच्या डांबरी पृष्ठभाग ५.५० मी रुंदीचा आहे.

रस्त्याच्या कि.मी. ११०/०० ते ११३/०० या कि.मी दरम्यानच्या ५ कि.मी. लांबीतील व कि.मी. ११०/०० ते ११३/०० या ३ कि.मी. लांबीतील रस्त्यांच्या डांबरी पृष्ठभागाचे रुंदीकरण करण्याची कामे मंजूर करण्यात आली आहेत. ही कामे प्रगतीत असून निधिच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत रस्त्यावरील वाहतुक सुरळीतपणे चालु आहे.

उर्वरीत लांबीतील पृष्ठभागाचे रुंदीकरण करणे व इतर आवश्यक कामे मंजूरी निकष, निधी व प्राधन्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

## धामणगांव रेल्वे (जि.अमरावती) येथील पारधी समाजाच्या विकासासाठी विविध रस्त्याच्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत

**(३०) ४२६८८ (२९-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगांव रेल्वे (जि.अमरावती) येथील पारधी समाजाच्या विकासासाठी चांदूर रेल्वे तरोडा पारधी बेडा ते चांदूर रेल्वे सावंगी मग्रापूर रस्ता, गौरखेडा पारधी बेडा ते बासलापूर जोड रस्ता, शिरपूर पारधी बेडा ते यवतमाळ हायवे जोड रस्ता, जगतपरू ते शिवारा पारधी बेडा या जोड रस्त्याच्या कामांसाठी सन २०१५-१६ करीता प्रशासकीय मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबातचे निवेदन मा.आदिवासी विकास मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निधीची तातडीने पूर्तता करण्याबाबत शासनाने पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०७-२०१६) :** (१) होय.

(२) नाही.

(३) सन २०१५-१६ मध्ये रु. २४.०० कोटी अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी ७०% तरतुद बीडीएस प्रणालीवर उपलब्ध होती. त्या मर्यादेत १६.८० कोटी रकमेच्या विविध बाबींना या विभागाच्या दिनांक ३०.०१.२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली उर्वरित ३०% रक्कमेपैकी रु.२७३.१२ लक्ष इतका निधी पारधी विकास कार्यक्रमांतर्गत रस्त्यांच्या कामाकरीता वितरित करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला असता सन २०१५-१६ चे सुधारित अंदाज अंतिम झाल्याने त्या विभागाने सहमती दर्शविली नाही. सदरची बाब मा. श्री. विरेंद्र जगताप वि.स.स यांना दिनांक ३ मे, २०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) ओणी-अणुस्कुरा, सौंदळ, खडीकोळवण, येळवण व रायपाटण रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३१) ४४०४५ (२१-०४-२०१६). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) ओणी-अणुस्कुरा, सौंदळ, खडीकोळवण, येळवण व रायपाटण रस्त्यांची दुरवस्था झाली असून यावरुन जड-अवजड वाहने चालविणे चालकांना गैरसोयीचे होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) तसेच त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०७-२०१६) :** (१) नाही.

(२) व (३) सदर रस्ता सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सहकारी संस्थांच्या करण्यात आलेल्या सर्वेक्षणात केवळ कागदोपत्री चलणाऱ्या संस्थांची नोंदणी रद्द करण्याच्या निर्णयाबाबत**

**(३२) ४४२०७ (२७-०४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सहकार आयुक्तांच्या आदेशानुसार मुंबईतील ४ जिल्हा उपनिबंधक कार्यालयांच्या अखत्यारीतील सहकारी संस्थांच्या करण्यात आलेल्या सर्वेक्षणात केवळ कागदोपत्री चलणाऱ्या ११९८ संस्थांची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास, राज्य शासनाने घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या संस्था बंद स्थितीत आहेत किंवा नोंदणीच्या ठिकाणी अस्तत्वित नाहीत अशा ११९८ संस्थांची नोंदणी त्वरीत रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०७-२०१६) :**(१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

एकूण ३२६६ संस्था बंद आढळून आल्या आहेत. त्यापैकी १६८२ संस्थाची नोंदणी रद्द केलेली आहे.

(३) लागू नाही.

---

**राज्यातील अनुदानित आश्रमशाळांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(३३) ४४४७६ (२९-०४-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित आश्रमशाळांवर पडणारा आर्थिक ताण दूर करण्यासाठी अनुदानात वाढ करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,,

(२) असल्यास, सदरहू अभ्यासगटाने याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अहवालात नमूद केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, सदरहू शिफारशींची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे. दिनाक १ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये परिक्षण अनुदानास वाढ करणेबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(२) नाही.

(३), (४), (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील विविध प्रकारच्या १६९९ संस्था बंद असल्याबाबत**

**(३४) ४४७०७ (२७-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकारी विभागाने केलेल्या सर्वेक्षणात कोल्हापूर जिल्हयातील विविध प्रकारच्या १६९९ संस्था बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंद असलेल्या संस्थावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, केलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०७-२०१६) :** (१) होय, अंशतः खरे आहे दिनांक १ जुलै, २०१५ ते ३० नोव्हेंबर,२०१५ या कालापर्यत कोल्हापूर जिल्हयात सहकार विभागाने केलेल्या सर्वेक्षणात कार्यस्थगित ९४५, बंद ७२० व नोंदणीकृत पत्यावर ठावठिकाणी नसलेल्या १७०७ अशा एकूण ३३७२ संस्था बंद अवस्थेत आढळून आल्या.

(२) सर्वेक्षण मोहिमेमध्ये बंद आढळून आलेल्या संस्था अवसायनात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) सर्वेक्षण मोहिमेमध्ये बंद आढळून आलेल्या संस्थांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व अंतर्गत नियम १९६१ अंतर्गत संस्था अवसायनात घेण्याची कार्यवाही चालू आहे. ज्या संस्थांकडे येणे. देणे काही नाही अशा संस्था प्राधान्याने अवसायनात घेवून संस्थांची नोंदणी रद्द करणेत येत आहेव ज्या संस्थांकडे येणे-देणे आहे अशा संस्थाचे अवसायनाबाबत कार्यवाही अधिनियमामार्फत तरतुदी व शासन परिपत्रकीय सुचनांनुसार करण्यात येत आहे,
(४) लागू नाही.

---

**सावदे ते रिंगणगाव (ता.एरंडोल, जि.जळगांव) या रस्त्याचे**
**काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(३५) ४६०७७ (२९-०४-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावदे ते रिंगणगाव (ता.एरंडोल, जि.जळगांव) या रस्त्याचे काम (प्र. जि. मा. ३२) अतिशय निकृष्ट दर्जाचे होऊन यामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्या काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंदनवाही (ता.राजूरा, जि.चंद्रपुर) तालुक्यातील येथील**
**रेशीम-कोसा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(३६) ४६३५९ (२१-०४-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजूरा (जि.चंद्रपुर) तालुक्यातील चंदनवाही गावानजीक सन १९९१-९२ मध्ये रेशीम-कोसा प्रकल्प उभारण्यात आलेला होता, परंतु शासनाच्या दुर्लक्षामुळे मागील २० वर्षापासून सदर प्रकल्प प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प सुरु केल्यास बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याने प्रकल्प पुन्हा सुरु करण्याची मागणी परीसरातील नागरीकांने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्प पुन्हा सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१६) :** (१), (२) व (३) वंदनवाडी (ता. राजूरा जि. चंद्रपूर) येथील फार्मवर तुती रेशीम शेतकऱ्यांसाठी पथदर्शक प्रकल्प सुरु करण्यात आला होता तथापि परिसरातील सिमेंट कारखाने, कोळसा खाणी यातील प्रदुषणामुळे तेथील वातावरण तुती लागवडीसाठी पोषक नसल्याने सन १९९८ पासून तेथे किटक संगोपन घेण्यात आलेले नाही. तेथील वातावरण टसर रेशीम साठी पोषक असल्याचे आढळून आल्याने सन २०१३-१४ मध्ये तेथील २.० हेक्टर क्षेत्रावर ऐन व अर्जुन वृक्षाची लागवड करण्यात आली आहे. येत्या ५-६ वर्षात तेथे टसर रेशीम कोषाचे संगोपन सुरु होणार असल्याने परिसरातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील साक्री-नामपूर-सटाणा-पिंपळदर-खामखेडा-कळवण-नाशिक या राज्य महामार्ग क्र.१७ वरील मांगबारी-खामखेडा दरम्यानच्या रस्त्याची झालेली दुरावस्था**

**(३७) ४७२९१ (२९-०४-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील साक्री-नामपूर-सटाणा-पिंपळदर-खामखेडा-कळवण-नाशिक या राज्य महामार्ग क्र.१७ वरील मांगबारी-खामखेडा दरम्यानच्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून ठिकठिकाणी डांबर उखडल्याने वाहतुकीस अडचणी निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यावर वारंवार वाहतूक कोंडी होऊन अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी वाहनधारक, यात्रेकरु व परिसरातील नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हा रस्ता तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) मागबारी ते खामखेडा (साक्र. ३०/७०० ते ३४/७००) या लांबीतील नुतनीकरणाचे कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. निविदा निश्चितीनंतर काम हाती घेऊन निधीच्या उपलब्धतेनुसार पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**यवतमाळ जिल्हा परिषद बांधकाम विभागाअंतर्गत रुद्रापुर ते चिकणी पांदण रस्त्याच्या कामात गैरप्रकार झाल्याबाबत**

**(३८) ४७७५२ (०५-०५-२०१६). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषद बांधकाम विभागाने आर्णी येथील रुद्रापूर ते चिकणी हा पांदण रस्त्याचे बांधकाम नियोजित नकाशा प्रमाणे न करता अल्पभुधारक शेतकरी बळीराम जयराम सोयाम यांच्या शेताच्या मध्य भागामध्ये करुन शेताचे मोठयाप्रमाणात नुकसान केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास संबधीत रस्ता एकीकडे नियोजित नकाशामार्फत न करता दुसरीकडे तयार करण्यात आलेला असल्याचे आरोप शेतक-याने केला आहे तसेच सदरील काम संबधित अभियत्याने निकृष्ट दर्जाचे केले असून पाणी जाण्यासाठी सिमेंटचे पाईप टाकण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्ता हा चिकणी शिवारातील शेत असलेले अल्पभुधारक आदिवासी शेतकरी बळीराम जयराम सोयाम यांच्या शेताच्या मधोमध झाल्यामुळे अल्पभुधारक शेतक-याचे मोठे नुकसान झाल्यामुळे नुकसान भरपाई मिळण्याबाबतची मागणी आर्णी तहसिलदार व जिल्हा परिषद बांधकाम विभाग, यवतमाळकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली व सदर प्रकरणी दोषी अधिकाऱ्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१५-०७-२०१६) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सनगांव (जि.हिंगोली) तालुक्यातील दाताडा ते आजेगांव या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३९) ४८३६३ (२८-०४-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सनगांव (जि.हिंगोली) तालुक्यातील दाताडा ते आजेगांव या तीन किमी रस्त्याचे आजेगांव जवळील दिड किमी रस्त्याचे डांबरीकरण पुर्ण करण्यात आले उर्वरित रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम दीड वर्षापासून प्रलंबित असल्याने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम तातडीने पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्नांकित रस्ता हा रामा २२७ ते साखरा- जयपूर पालकन्हेरगांव - दाताडा - आजेगाव - साबलखेडा - बाभूळगांव ते रामा - २५८ या प्रजिमा - २७ चा भाग आहे. हा रस्ता जिल्हापरिषदेकडून २०१४ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

दाताडा ते आजेगाव या गावांदरम्यान या रस्त्याची लांबी ३ कि.मी. आहे. किमी २३/६०० ते २३/६०० २५/०० मध्ये रस्त्याचे मजबूतीकरण व शबरीकरणाचे काम सन २०१५ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

उर्वरित किमी २२/०० ते २३/६०० या १.६०० किमी लांबीच्या कामासाठी सन २०१५ -१६ च्या अर्थसंकल्पामध्ये रु. ६०.०० लक्ष रकमचे काम समाविष्ट आहे. कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक ४.३.२०१६ रोजी देण्यात आले आहेत. माहे डिसेंबर, २०१६ अखरेपर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

### पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरुन शासनाने व्हिडीओग्राफीच्या साह्याने केलेले सर्व्हेक्षण व कंत्राटदाराने केलेल्या सर्व्हेक्षणाच्या आकडेवारीत सुमारे ५० टक्क्यांची तफावत असल्याबाबत

**(४०) ४८७७७ (२९-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरुन रोज किती वाहने धावतात, याचे राज्य रस्ते विकास महामंडळाने व्हिडीओग्राफीच्या साह्याने केलेले सर्व्हेक्षण व कंत्राटदाराने केलेल्या सर्व्हेक्षणाच्या आकडेवारीत सुमारे ५० टक्क्यांची तफावत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तफावतीची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०७-२०१६) :** (१) नाही.
(२), (३) व (४) या मार्गावर वेगवेगळया मार्गासाठी वेगवेगळे दर निर्देशित आहेत. वाहनधारक एका नाक्यावर योग्य टप्प्यासाठी पथकर देउन दुसऱ्या पथकर नाक्यावरुन पथकर नाक्यावरुन exit ramp द्वारे बाहेर जाऊ शकतात. या प्रवासात दुसऱ्या पथकर नाक्यावर पथकर द्यावा

लागत नाही. परंतु व्हिडीओग्रॉफिक सर्व्हे मध्ये या वाहनांची दोनदा नोंद होते. त्यामुळे प्रतिदिन पथकर भरुन जाणाऱ्या व व्हिडीओ रेकॉडिंग मध्ये समाविष्ट वाहनांची सरासरी संख्या यामध्ये तफावत आढळून येते. वाहनांची सरासरी संख्या यामध्ये तफावत आढळून येते. वाहनांच्या नोंदीची तफावत या कारणाने तसेच राज्य सरकारने निर्देशित केलेल्या टोल मध्ये सूट असलेल्या वाहनांमुळे आहे. म.रा.र.वि. मंडळातर्फे पथकर वसूलीसाठी अत्याधुनिक यंत्रणा बसविण्याचे प्रस्तावित असून यामुळे व्हिडीओग्राफीक नोंदी व पथकर भरणाऱ्या वाहनांच्या नोंदी एकमेकांशी निगडीत होऊन ही तफावत दूर होईल वरील वस्तुस्थिती लक्षात घेता चौकशी करण्याची आवश्यकता भासत नाही.

---

**बोईसर-तारापूर मार्गावरील बाणगंगा नदीवरील पुलाच्या बांधकामाबाबत**

**(४१) ४८८६० (२९-०४-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर-तारापूर मार्गावरील बाणगंगा नदीवरील पुलाच्या दर्जाहीन कामाकडे सार्वजनिक बांधकाम विभाग व अणुऊर्जा प्रकल्प अधिकाऱ्यांचे पुर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने दर्जाहीन बांधकामाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०७-२०१६) :**(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातआदिवासी विकास महामंडळाच्या गोदामांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४२) ४८८८० (२८-०४-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागात आदिवासी विकास महामंडळाची अनेक गोदामांची कित्येक वर्षापासून दुरुस्ती न केल्याने जुनी, विदारक व धोकादायक इमारतीत शासनाचा कोट्यवधी रुपयांचा धान्यसाठा (माल) ठेवला जात असल्याने सदरचा धान्यसाठा खराब होत आहे तसेच कर्मचारी व हमाल जीव मुठीत ठेवून काम करीत असल्याचे दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त गोदामांच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१३-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

पालघर जिल्हयात महामंडळाचे मालकीचे तिन (३) गोदामे असून आदिवासी विविध कार्यकारी संस्थेचे २५ गोदामे, शासकीय २ व खाजगी मालकीची १६ गोदामे अशी एकूण भाडयाने घेतलेल्या ४३ गोदामांसह एकुण ४६ गोदामांमध्ये १,१२,१५७.२४ क्विंटल धान साठवणूक करुन ठेवलेला असुन सदर साठा खराब झालेला नसून सुस्थितीत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहर व जिल्हयात ज्येष्ठ नागरिक धोरणाची अमलबजावणी होत नसल्याबाबत**

**(४३) ४९१९८ (२८-०४-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाचे जीवन जगता यावे यासाठी ज्येष्ठांसाठीचे धोरण बनवण्यात आले मात्र, बराच कालावधी लोटला तरीही ते अद्‌याप पुणे शहर व जिल्हयात राबवले जात नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. राजकुमार बडोले (११-०७-२०१६) :**(१) नाही, हे खरे नाही.

शासनाच्या दिनांक २८.०९.२०१० च्या अधिसूचने अन्वये पुणे जिल्हयांच्या प्रत्येक उप विभागासाठी न्यायाधिकरण गठीत करण्यात आले आहे.

(२) प्रश्नच उद्भवत नाही.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**बुलडाणा-अजिंठा, बुलडाणा-धाड (जि.बुलडाणा) या रस्त्याची झालेली दुरावस्था**

**(४४) ४९२२७ (२९-०४-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा-अजिंठा, बुलडाणा-धाड (जिल्हा बुलडाणा) या रस्त्याची दुरावस्था झाल्याने सदर रस्त्यावरुन प्रवास करणा-या आबालवृध्दांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत असून वाहतुकीस अडथळे निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार सदरहू रस्त्याच्या नुतनीकरण व दुरुस्तीचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०७-२०१६)** :(१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२)

(१) बुलढाणा अजिठा रस्त्याची एकूण लांबी २३.५९० कि.मी. असून त्यापैकी २०.७९० कि.मी. लांबी चांगली असून २.८०० कि.मी. लांबीतील खड्डे भरुन सुस्थितीत ठेवण्यात आले आहे सदर रस्त्यावर सन २०१५ - २०१६ च्या अर्थसंकल्पात रु. ६०.०० लक्ष किमतीचे २.०० कि.मी. लांबीच्या रस्त्याची सुधारणा करण्याचे काम मंजूर आहे.

(२) बुलढाणा - धाड रस्त्याची एकुण लांबी ३७.८०० कि.मी. असून त्यापैकी २३.९०० कि.मी. लांबी चांगली असुन १४.९०० कि.मी. लांबीतील खड्डे भरुन सुस्थितीत ठेवण्यात आले आहे. सदर रस्त्यावर सन २०१५ - २०१६ च्या अर्थसंकल्पात रु. ८०.०० लक्ष किंमतीचे ३.०० कि.मी. लांबीच्या रस्त्याची सुधारणा कण्याचे काम मंजूर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडदे ते विक्रमगड मार्गावरील (पालघर जिल्हा) तांबडी नदीवरील पूल जीर्ण व कमकुवत झाल्याने धोकादायक झाल्याबाबत**

**(४५) ५०३६१ (२९-०४-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडदे ते विक्रमगड मार्गावरील (जि.पालघर) तांबडी नदीवरील पूल जीर्ण व कमकुवत झाल्याने धोकादायक बनलेला असताना सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केलेली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०७-२०१६)** :(१) हे खरे नाही.

तांबडी नदीवरील पूल सुस्थितीत असून सध्या वाहतूकीस सुरक्षित आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेणूका देवस्थानाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या नुतनीकरणाबाबत**

**(४६) ५१४४४ (२९-०४-२०१६). श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहुरगड देवीच्या साडेतीन पिठांपैकी एक पिठ असल्याने देवीच्या दर्शनासाठी देशातून लाखो भाविक येत असून रा. मा. २६५ व रा. मा. ५१ व आंध्रा सिमा हा रस्ता अतिशय खराब झाल्याने आलेल्या भाविकांना अपघातास तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त विषयी संबंधीत मंत्री महोदयांना वेळोवेळी निवेदन देवून सुध्दा अद्यापपर्यंत ह्या रस्त्याच्या नुतनीकरणासाठी कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१६) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) व (३) प्रश्नांकित रस्ते रस्ते विकास योजना २००१-२०२१ नुसार रा.मा.क्र. २६५ व रा.मा.क्र. ५१ आहेत. रस्त्यावर अर्थसंकल्पात ६ काम पूर्ण ३ कामे प्रगतीत व २ कामे निविदा स्तरावर आहेत. तसेच योजनेतर कार्यक्रमांतर्गत ८ कामे मंजूर असून त्यातील ४ कामे पूर्ण झालेली आहेत व ४ कामे प्रगतीत आहेत. कामाच्या प्राधान्यक्रमानुसार व निधी उपलब्धतेनुसार कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत रस्ता सुस्थितीत असून वाहतूक सुरळीतपणे चालू आहे.

---

### पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत दिल्या जाणा-या व्याज सवलतीबाबत

**(४७) ५१८३७ (२७-०४-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतक-यांना पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या व्याज सवलतीचे वाटप सातत्याने रखडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) सदरील योजनेचे व्याज अनुदान तत्काळ शेतक-यांना उपलब्ध करून देण्यास शासन काय कार्यवाही केली वा करणार आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जिल्हा परिषदेकडून हस्तांतरीत झालेल्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४८) ५२९५० (३०-०४-२०१६). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषदेकडून सन २०१३-१४ मध्ये सुमारे ३८० किमी लांबीचा हस्तांतरीत झालेल्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरवस्था झालेली असतानाही या रस्त्याची लांबी वाढूनही त्याप्रमाणात निधी वाढून दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) जिल्हा परिषद विभागाकडून हस्तांतरित झालेल्या रस्त्यापैकी काही लांबीमध्ये आवश्यक दुरुस्तीची कामे व अन्य शासकीय योजनेमधून हाती घेवून पूर्ण करण्यात आली आहेत. उर्वरीत दुरुस्तीची कामे, मंजूरी, निधी निकष व प्राधान्य क्रमानुसार हाती येवून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यूथ डेव्हलमेंट को-ऑपरेटीव्ह क्रेडीड सोसायटी, सांगली यांनी त्यांच्या स्वमालकीच्या जागा घेतल्याबाबत**

**(४९) ५३०१८ (२७-०४-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यूथ डेव्हलमेंट को-ऑपरेटीव्ह क्रेडीड सोसायटी, सांगली यांनी त्यांच्या स्वमालकीच्या इमारती बांधण्यासाठी किती ठिकाणी जागा घेतलेल्या आहेत,

(२) या जागापैंकी सन २०१५ पर्यंत किती जागांची विक्री केलेली आहे व त्यांना त्यातून किती रक्कम प्राप्त झाली आहे,

(३) जागेची विक्री करीत असताना त्यांनी शासनाकडून परवानगी घेतली आहे काय, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०७-२०१६) :** (१) युथ डेव्हलपमेंट संस्थेने ८ जागा खरेदी केलेल्या होत्या.

(२) युथ डेव्हलमेंट संस्थेने सन २०१५ पर्यत ७ जागांची जाहीर लिलावाने रक्कम रु. १,४२,२४,०००/- इतक्या रकमेस विक्री केलेली आहे.

(३) होय.

युथ डेव्हलपमेंट संस्थेने जागेची विक्री करताना संस्थेने सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, म.रा. पुणे यांची परवानगी घेतली आहे.

---

**सांगली जिल्हयातील सहकारी शेतकरी साखर कारखान्याचे काम अद्यापही पूर्ण झाले नसल्याबाबत**

**(५०) ५३१७९ (२७-०४-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील सहकारी शेतकरी साखर कारखाना लि.कोकळे (साईटसोनी) या साखर

कारखान्याला शासनाने भागभांडवल दिले असून टर्म लोनसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला थकहमी दिलेली असूनसुध्दा या साखर कारखान्याचे काम अद्यापही पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतकरी सहकारी कारखान्याला वसंतदादा सहकारी साखर कारखाना लि. सांगली यांच्या संलग्न विश्वस्त संस्था यांचेकडील रक्कम बेकायदेशीरपणे वापरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०७-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी अहवालातील निष्कर्षाच्या आधारे याबाबत छाननी करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.